MHRG100006822026

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४५२/२०२६**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (२०२३ चा अधिनियम क्र. ४६) अन्वये गुन्हयाचे विवरण**

**यु. एम. जाधव, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – ०२/०७/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – ०२/०७/२०२६ |
| ३. | तक्रारदाराचे नाव | – **सरकारतर्फे महाड शहर पोलीस ठाणे.** |
| ४. | आरोपीचे नांव | – **विजय बादशहा चव्हाण उर्फ विजय बादशाह चव्हाण,** |
| | वय | – ३२ वर्षे, |
| | राहणार | – नांगलवाडी, ता. महाड, जि. रायगड. |
| ५. | गुन्हयाचे विवरण | – |

दिनांक ०२/०७/२०२६ रोजी १९.०० वाजताचे सुमारास मौजे महाड शहरातील जिजामाता उदयान ते महाड बाजारपेठ अशा जाणाऱ्या सार्वजनिक रोडवर, क्लासिक मेन्सवेअर महाड या दुकानासमोर, ता. महाड, जि. रायगड येथे तुम्ही तुमच्या मालकीची भाजी विक्री हातगाडी ही सार्वजनिक रस्त्यावर उभी करून प्रचंड प्रमाणात गर्दी करून रहदारीस अडथळा व अटकाव करून तसेच सार्वजनिक रहदारीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आला म्हणून तुम्ही आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला.

JADHAV UDAY MAHADEV

Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.07.28 15:31:42 +0530

महाड,
दिनांक – २८/०७/२०२६

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

**आरोपीचे प्रतिकथन** –

प्रश्न क्र. १ – तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. २ – तुमच्या ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचुन दाखविला व तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – मला गुन्हा कबुल आहे.

-------------

आरोपीची सही / अंगठा

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.07.28 15:31:52 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक – २८/०७/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

# **न्या य नि र्ण य**

सदर आरोपी विरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दोषारोपपत्रामध्ये आरोपीचे नाव विजय बादशाह चव्हाण असे आहे, परंतु आधारकार्डमध्ये विजय बादशहा चव्हाण असे नाव नमुद आहे. त्याबाबत आरोपीने शपथपत्र दाखल केले की, त्या दोन्ही नावांच्या व्यक्ती एकच असुन ती म्हणजे तो स्वत: आहे. त्याने त्याचे नाव विजय बादशहा चव्हाण असे सत्यप्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. आजरोजी अन्वेषण अधिकारी याने आरोपीच्या नावामध्ये नजरचुकीने विजय बादशाह चव्हाण असे नमुद झाले आहे. परंतु, दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असल्याचे शपथपत्र दाखल केले आहे. आजरोजी आरोपीने न्यायालयात सदर प्रकरणात स्वच्छेने गुन्हा कबुल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आरोपीने गुन्हा कबुल केल्यांनतर होणाऱ्या परिणामाची जाणीव करुन देण्यात आली. त्यानंतर देखील आरोपीने स्वतःच्या स्वमर्जीने गुन्हा कबुल केला आहे. सहाय्यक सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वरील प्राप्त परिस्थिती लक्षात घेतली असता, सरकार पक्षाची तक्रारमधील कथने निर्विवादपणे सिध्द झालेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. त्यामुळे

आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. वरील सर्व हकीकतेवरून आरोपीच्या आधारकार्डवरील नावाचा व दोषारोपापत्रामधील नमुद अशा दोन्ही नावांचा उल्लेख करण्यात येत आहे. आरोपीने शिक्षेबाबत दया दाखविण्याची विनंती केली. त्याने नमुद केले की, तो घरातील एकमेव कमविता व्यक्ती आहे. आरोपीने केलेली विनंती, आरोपीचे वय, गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## **आ दे श**

आरोपी यांस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ चे गुन्हयाकरिता दोषी धरुन सदर गुन्हयाबद्दल आरोपीला एकुण रक्कम रु. ५००/– (अक्षरी पाचशे रुपये मात्र) द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर दंडांची रक्कम न भरल्यास ०२ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)*

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.07.28 15:32:00 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक – २८/०७/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/ order are same, word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 28/07/2026 |
| Judgment / order signed by the P.O. on | :- | 28/07/2026 |
| Judgment / order uploaded on | :- | 28/07/2026 |